श्री राम चंद्र मिशन®
India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY





## चेन्नई येथे गुरुदेव

शनिवार १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास पूज्य गुरुदेवांचे 'गायत्री' येथून आश्रमात आगमन झाले. सकाळचा सत्संग नुकताच संपला होता व गुरुदेवांच्या स्वागताकरिता अभ्यासी रांगेत उभे होते.

'माहिती–तंत्रज्ञान' कार्यशाळेचे कामकाज गुरुदेवांनी आपल्या कार्यालयातून सी.सी.टी.व्ही. द्वारे पाहिले. बंधू कमलेश व बंधू पी.आर. कृष्णा यांनी दिलेली सर्व भाषणे त्यांनी ऐकली व त्यावर प्रश्न विचारले. दुसऱ्या दिवशी सत्संगानंतर प्रकाशित करावयाच्या डि.व्ही.डिं. बद्दल गुरुदेवांना रात्रीच्या भोजनानंतर सांगण्यात आले. यावर गुरुदेव म्हणाले, 'दृक–श्राव्य प्रकाशनांकरिता कृपया दुसऱ्या कोणालातरी सांगा. यापुढे मी केवळ प्राणाहुति देण्याकरिताच येईन. माझे स्थान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी (संदेश) पोचवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या टेलिग्राफच्या खांबाप्रमाणे आहे". गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचालन केले व प्रसिद्धी–समूहाने काही ध्वनि–चित्रफीतींचे प्रकाशन केले.

### उत्तर अमेरिका चर्चासत्र

सोमवार दि. २० फेब्रुवारी रोजी उत्तर अमेरिका चर्चासत्राचा प्रारंभ झाला. प्रकृति अस्वस्थ असूनही गुरुदेवांनी सकाळचा सत्संग संचालित केला. संध्याकाळी यू.एस.ए.मधील नवीन अभ्यासींचा एक घोळका दिवाणखान्यात जमा झाला होता. गुरुदेवांना त्यांना भेटून आनंद झाला व त्यांनी एक हृदयस्पर्शी असे, प्रोत्साहनपर भाषण दिले. उत्तर अमेरिका चर्चासत्राच्या आठवड्यादरम्यान प्रत्येक सकाळी गुरुदेव तीन प्रशिक्षकांना प्रशिक्षण देत होते. हे त्यांच्याकरिता अत्यंत थकविणारे काम होते. स्वत: आजारी व थकलेले असूनही गुरुदेव अविरत कामात होते.

मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी ध्यान–कक्षामध्ये झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरिता गुरुदेव उपस्थित होते. या वेळी 'आपले संपूर्ण हृदय द्या' या विषयावर त्यांनी एक प्रभावी भाषण केले. या भाषणातील काही मुख्य मुद्दे असे :



•सहज मार्गामध्ये आपल्याला आपल्या प्रयत्नांसाठी जोखले जाते, आपल्या क्षमतेद्वारे आपण काय प्राप्त केले त्यासाठी नाही.

•प्रेमाकरता पैसे द्यावे लागत नाहीत, पण हीच गोष्ट आपण राखून ठेवतो.

•परमेश्वराने आपल्या सुखाकरिता काहीही निर्माण केलेले नाही. पंचेंद्रियांचे काम आपल्या जीवनात मार्गदर्शन करणे हे आहे.

•आध्यात्मिकता आपले हृदय अभंग राहण्याकरिता मदत करते.

बुधवार दि. २२ फेब्रुवारी रोजी भगिनी कस्तुरी यांच्या निधनाची बातमी गुरुदेवांना समजली. एका युवा अभ्यासीच्या हैदराबाद आश्रम येथे झालेल्या अपघाती मृत्युमुळेही ते अत्यंत दु:खी झाले.

चर्चासत्राच्या आठवड्यातील एक दिवशी, रात्रीच्या विश्रांतीच्या सुमारास गुरुदेव म्हणाले, "आज माझी 'शिवरात्र' आहे (रात्री मला झोप लागणार नाही) असे मला वाटते" दुसऱ्या दिवशी गुरुदेवांचे डॉक्टर म्हणाले की संपूर्ण रात्र ते जागे होते. नेहेमीप्रमाणे गुरुदेवांना भेटण्यासाठी आलेल्या अभ्यासींचा प्रवाह अव्याहतपणे सुरू होता व जेव्हा शक्य असेल तेव्हा त्यांना भेटण्याचा प्रयत्न ते करीत होते.

गुरुवार दि. १ मार्च रोजी सकाळच्या न्याहारीनंतर वार्तालापादरम्यान आर्थर कोस्लर यांनी लिहिलेल्या काही पुस्तकांचा गुरुदेवानीं संदर्भ दिला व ती वाचण्याची शिफारस केली.

•ज्या प्रकारचे प्रशिक्षण आपल्याला दिले गेलेले असते त्याप्रकारचा आपला दृष्टीकोण तयार होतो. विचारांच्या पलिकडे जाण्यासाठी तुम्हाला विज्ञान, कला इत्यादींची माहिती असणे आवश्यक आहे. सर्व काही माहित असण्याची गरज नाही परंतु प्रत्येक गोष्टीचे स्थान ओळखता आले पाहिजे.

•अत्यंत दु:खदायक प्रसंग माणसांमधील सर्वात उत्तम जे काही असेल ते बाहेर आणतात. हे दु:खामुळे होते. सुखात्मिकेचा परिणाम याच्या

उलट होतो. यामुळे माणसांमधील अवगुण बाहेर येतात.

•कोणतीही गोष्ट इतकी खराब असू शकत नाही की त्यात चांगल्या गोष्टीचा काहीही अंश नसेल. याच्या उलटही तितकेच खरे आहे. जेथे एक आहे, तेथे दुसरेही असलेच पाहिजे.

शनिवार दि. ३ मार्च रोजी गुरुदेव 'बॉस्टन' येथील एका तरुणाला प्रशिक्षक म्हणून तयार करत होते. गुरुदेवांनी त्याला सांगितले, "तुला प्रशिक्षक करण्याआधी मी तुला एक इशारा देऊ इच्छितो. तू तुझ्या अति–उत्साहात, अविवेकीपणे प्रत्येकाला सहजमार्गात आणायचे नाही. समजा एखादा मनुष्य अंमली पदार्थांचे सेवन करणारा असेल, तर तू असे म्हणता कामा नये की मला त्याला सिटींग देऊन त्याची मदत करू दे. तू कनवाळू व्हायचे नाहीस. त्यांना (बाबूजी महाराजांच्या छायाचित्राकडे निर्देश करुन) कृपावंत होऊ दे."

## इराणी चर्चासत्र

सोमवार दि. ५ मार्च रोजी इराणी चर्चासत्राची सुरूवात झाली आणि दि, ६ मार्चला गुरुदेवांनी निवासकक्ष 'अ' मध्ये सत्संगाचे संचालन केले. सिटींगनंतर गुरुदेव म्हणाले की मला बरे वाटत नसल्यामुळे मी भाषण करणार नाही. त्यानंतर काही इराणी अभ्यासींनी गुरुदेवांना भेटवस्तू देण्यास प्रारंभ केला तेव्हा त्यांचे हृदय भरून आले. गुरुदेव आपला बेत बदलतील व भाषण करतील हे सर्वांच्या लगेच लक्षात आले. अनेकांना यावेळी आपले अश्रू आवरता आले नाहीत, गुरुदेवांचा आवाज देखील हळवा झाला होता व काहीतरी विशेष असे संप्रेषित होत होते. गुरुदेव म्हणाले, "प्रकृति अस्वास्थ्यामुळे मी भाषण करणार नव्हतो, परंतु तुमच्या आत्यंतिक प्रेमाने मला बोलावयास भाग पाडले." कक्षातील जवळजवळ प्रत्येक जण रडत होता. गुरुदेव म्हणाले, "जेव्हा कोणी मनुष्य अशाप्रकारे रडतो, तेव्हा ते त्यांचे हृदय मृदु होत असल्याचे लक्षण आहे व अशावेळी दुसऱ्या व्यक्तीने त्याला समजावणे किंवा त्याल रडू नको सांगणे योग्य नाही." गुरुदेव म्हणाले, सहजमार्गाच्या संपूर्ण साधनेने हृदय मृदु झालेच पाहिजे. सुरुवातीची काही वर्षे अश्रू येतात, पण त्यानंतर मृदु होणे अश्रूंशिवाय सुरू राहते. हृदय मृदु होणे कधीच थांबता कामा नये. त्यानंतर गुरुदेव 'गायत्री' या त्यांच्या निवासस्थानी गेले. शुक्रवार दि. ९ मार्च रोजी त्यांनी सर्व इराणी अभ्यासींना गायत्री येथे भोजनासाठी आमंत्रित केले.

शनिवार दि. १०मार्च रोजी सकाळी ८.४५ वाजता गुरुदेव आश्रमात आले. निवासकक्ष 'अ' मधील इराणी अभ्यासींच्या सत्संगानंतर गुरुदेव म्हणाले, " आधी मी फक्त भाषण देणार होतो, पण येथील या इराणी तरुणीस ध्यानास सुरुवात करायची होती त्यामुळे मी सर्वांना सिटींग दिले. पहा, आपण कशा प्रकारे योजना बनवतो व त्या कशा बदलतात. पाश्चिमात्य लोकांप्रमाणे आपण फार योजना बनवू नयेत, पण प्रवाहासोबत जाण्यास तयार रहावे." त्यानंतर ते 'नदी' विषयी बोलले, ती आपला मार्ग कसा स्वत: तयार करते व वहात जाते. आपले जीवन त्याप्रमाणे असले पाहिजे. आपण उंचावरून म्हणजेच प्रेमाच्या, श्रद्धेच्या उच्चतम आदर्शांनी सुरुवात केली पाहिजे व त्यानंतर ते खाली तळागाळापर्यंत प्रवाहीत होऊ दिले पाहिजेत, प्रत्येकाकडे पोहोचले पाहिजेत, त्या आदर्शांसोबत कोणतीही तडजोड न करता.

संध्याकाळी गुरुदेवांनी केरळ येथील विभागीय आश्रमाची चित्रफीत पाहिली व या क्षणी आश्रमाचे उद्घाटन झाले आहे आणि अभ्यासी त्याचा वापर करु शकतात असे त्यांनी जाहीर केले.

## मुक्तीविशयी

रविवार दि. ११ मार्च रोजी सकाळच्या सत्संगानंतर त्यांच्या शयनकक्षामध्ये बोलताना गुरुदेव म्हणाले की मुलांसाठी प्रत्येक अनुभव कसा नवीन व विस्मयकारक असतो. "अनेक वर्षे वाया घालवल्यानंतर मी "मी"च होण्यास शिकत आहे. हा विनोद नाही. आध्यात्मिकतेने मला 'मी स्वत:' बनण्यास शिकवले. मला हे शिकवले की जर मी 'स्वत:' नसेन तर माझी प्रगती होणे शक्य नाही." त्यानंतर विषयाचा रोख 'मुक्ती' कडे वळला. गुरुदेवांनी स्वत:ला अभ्यासींपासून, मिशन पासून तसेच त्यांच्या उत्तराधिकाऱ्यापासून कसे मुक्त करुन घेतले आहे याबद्दल सांगितले. ते पुढे म्हणाले, "मला वाटत असे की मी माझ्या अभ्यासींकरिता जबाबदार आहे. त्यामुळे मी त्यांच्याकरिता स्वत:चे हाल करीत असे. परंतु एका क्षणी मला असे जाणवले की मी माझ्या कामामधून काय बनू शकतो हे माझ्या गुरुदेवांना दर्शविणे ही माझी जबाबदारी आहे.मी काय बनवू शकतो ही नाही. या जाणिवेने मला माझ्या अभ्यासींपासून मुक्त केले. यानंतर माझ्या उत्तराधिकाऱ्याचा प्रश्न उपस्थित झाला. माझ्यानंतर काय होईल? कसे होईल? अशी काळजी मी करीत असे. एक दिवस मी म्हणालो, आता पुरे झाले. मी सर्व 'त्याच्या'वर सोपवले आहे, आता 'त्याने' कार्यभार सांभाळायचा आहे व ती 'त्याची' समस्या आहे आणि मी त्या चिंतेतून मुक्त झालो."

शनिवार दि. १७ मार्च रोजी न्याहारीनंतर गुरुदेव चित्तूरच्या सुमारे ५०० अभ्यासींना भेटण्यासाठी निवासकक्ष 'अ' मधे गेले. रविवार दि. १८ मार्च रोजी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर ते विल्लूपुरमच्या अभ्यासींच्या गटाला भेटले. अभ्यासींनीं आश्रम व अभ्यासी वसाहतीसाठी ७ एकर जमीन विकत घेण्याचे ठरवले आहे. गुरुदेवांनी 'स्टार वॉर्स' हा चित्रपट पाहिला आणि त्यांना योडाचा एक संवाद आवडल्याचे त्यांनी सांगितले. " भीती काळोखाकडे नेते, कारण भीती रागाकडे, राग तिरस्काराकडे व तिरस्कार दु:खाकडे नेतो, जे अखेरीस काळोखाकडे घेऊन जाते." संध्याकाळी गुजरातचे अभ्यासी गुरुदेवांच्या कुटिरात जमले होते. गुरुदेवांनी त्यांचे श्वसनाचे व्यायाम न करता सर्वांना सिटींग दिले. ते शांतपणे सर्वांना भेटले व त्यांनी अभ्यासींच्या विनंतीला मान दिला.

बुधवार दि. २१ मार्च रोजी गुरुदेवांनी आमराईतील एक आंब्याचे झाड एका जागेवरुन दुसरीकडे हलविण्याचे ठरवले. या हलवा–

हलवीत वृक्षाला इजा होणार नाही याची त्यांनी स्वत: खात्री करुन घेतली.

दि.२५ मार्च रोजी ओमेगा शाळेतील यावर्षी १२वी उत्तीर्ण होणाऱ्या सुमारे १०० विद्यार्थ्यांनी गुरुदेवांची भेट घेतली. त्यांनी त्यांच्यासोबत गप्पा मारल्या, अल्पोपाहार घेतला आणि समूह छायाचित्र काढले. दुसऱ्या दिवशी गुरुदेव 'गायत्री' या आपल्या निवास–स्थानी गेले आणि तेथे एक आठवडा राहिल्यानंतर शनिवारी ते आश्रमात परतले.

## 'सतत स्मरण गुरुदेवांना आकर्षित करते'

सोमवार दि. २ एप्रिल रोजी कानपुरच्या सुमारे ६५० अभ्यासींचे चर्चासत्र सुरु झाले. गुरुदेवांनी निवासकक्ष 'अ' मध्ये जाऊन सत्संग संचालित केला. तेथे काही इराणी अभ्यासी गुरुदेवांना भेटले. एका अभ्यासीने विचारले की, "आम्ही परतल्यानंतर गुरुदेवांचे लक्ष आमच्याकडे राहण्याकरिता काय करावे?" यावर गुरुदेव उत्तरले की "ज्याप्रमाणे गुलाब त्याच्या सुगंधाने व सौंदर्याने आकर्षित करतो,





बालक प्रेमाने आईला आकर्षित करते त्याचप्रमाणे अभ्यासी गुरुदेवांना त्याच्या किंवा तिच्या अवस्थेने (स्थितीने) आकर्षित करतो". गुरुदेव म्हणाले "आपली आधात्मिक अवस्था अशी असावी की ज्यायोगे गुरुदेव सतत आपल्या सन्निध राहतील. हे करण्याचा मार्ग म्हणजे यथायोग्य ध्यान आणि सतत स्मरणाचा सराव. हे जाणून की सतत स्मरण हे ध्यानापेक्षा श्रेष्ठ आहे." .एका अभ्यासीने विचारले की, "सतत स्मरणाच्या पुढची पायरी कुठली?" यावर गुरुदेव म्हणाले "तुम्ही त्या अवस्थेला आलात की मी सांगेन".

दुसऱ्या एका प्रसंगी एका अभ्यासी भगिनीने सांगितले की संगीत हा तिचा व्यवसाय होता, पण अलिकडे तिला असे जाणवते की तिच्या हृदयाचा ताबा गुरुदेव घेत आहेत तसेच संगीत आणि नाटकात तिचे मन रमत नाही. तिने तिचा व्यवसायच बदलावा का? असे तिने गुरुदेवांना विचारले. यावर गुरुदेव म्हणाले, "त्याची आवश्यकता नाही त्यापेक्षा जेव्हा जेव्हा तू वाद्य वाजवशील तेव्हा असा विचार कर की गुरुदेवच तुझ्या आत बासरी वाजवत आहेत मग तुझी वाद्ये वाजव.

शुक्रवारी दि. ६ एप्रिल रोजी बंधू कृष्णा यांनी भाषण केले आणि गुरुदेवांनी त्यांच्या कुटीरातून सी. सी. टी. व्ही. द्वारे ते ऐकले. भाषणानंतर गुरुदेवांनी निवासकक्ष 'अ' मध्ये जाण्याचे व सिटींग देण्याचे ठरवले. त्यानंतर त्यांनी केंद्रप्रमुखांना सूचना केली की त्यांचे कार्य अजुन पूर्ण झालेले नाही आणि त्यांना दुसरे दिवशी अजुन एक सिटींग द्यावी लागेल. दि.७ एप्रिल रोजी त्यांनी हिन्दीतून भाषण केले आणि सिटींग दिली. ते म्हणाले की ते जर कानपूरला गेले असते तर अभ्यासींना एक किंवा दोन दिवसच भेटले असते परंतु कानपूरचे अभ्यासी चेन्नई इथे आल्यामुळे त्यांना आठवडाभर गुरुदेवांचा सहवास मिळाला. अनेक अभ्यासींना त्या सप्ताहात संपूर्णत:

## "प्रत्येक सत्संग वैयक्तिक सिटींगसारखा असावा"



दि. १ एप्रिल रोजी रविवारी गुरुदेवांनी मनोवेधक असा सत्संग संचालित केला. ते ध्यान–कक्षातून बाहेर आले, गोल्फकार्टमध्ये बसले आणि नंतर लांब वायर असलेला ध्वनिक्षेपक मागवून 'सामूहिक सिटींग घेण्याची कला' यावर त्यांनी एक भाषण केले. ते म्हणाले की ते सिटींग देत होते तेव्हा त्यांना वाटले की प्रत्येक अभ्यासीला वैयक्तीक सिटिंग प्रमाणे अनुभूती कशा प्रकारे द्यावी हे प्रशिक्षकांनी शिकावे. ते म्हणाले की बंधू कमलेश पटेल यांना यापुढे हे करावे लागेल. यानंतर तेच रविवारचा सत्संग संचालित करतील. "अर्थात, मी येथेच असेन. कधीतरी मी सत्संग घेण्यासाठी येईनच. पण तो रविवारच असेल असे नाही. तो आठवड्यातील कुठलाही दिवस असू शकेल, मग तयारीत रहा !" हेच त्यांनी शुद्ध तामिळमध्ये पुन्हा सांगितले आणि तेथून प्रस्थान केले.

जो कोणी ध्यान करतो त्याचे आंतरीक सौंदर्य कसे दृष्यमान होते याचा एका भगिनीने एका अनौपचारिक संभाषणादरम्यान उल्लेख केला. गुरुदेवांनी स्पष्टीकरण दिले की जो ध्यान करतो तो जास्त सुंदर होतो असे नाही. ध्यानामुळे त्याची अंतस्थ दिव्यता दिसू लागते व तिचे तेज झळकते. केवळ एका सिटींग नंतर संपूर्णत: वेगळ्या दिसणाऱ्या व्यक्तीमध्ये अशा प्रकारे लक्षणीय बदल घडलेला गुरुदेवांनी पाहिलेला आहे.




परिवर्तन झाल्याचे जाणवले. पहिल्या सिटींग पासून ते शेवटच्या सिटींग पर्यंत लक्षात येण्याजोगा बदल झालेला होता.

रविवार दि. ८ एप्रिल रोजी प्रथमच गुरुदेवांच्या सूचनेनुसार बंधू कमलेश यांनी रविवारचा सत्संग संचालित केला. सायंकाळी गुरुदेवांनी तेथे आलेल्या काही अभ्यासींसमवेत चैतन्यपूर्ण चर्चा केल्यानंतर सर्वांना सिटींग देण्याचे ठरवले. त्यामध्ये १७ ते १८ वर्षे वयाच्या ५ ते ६ युवकांचा समावेश होता. जेव्हा त्यांनी गुरुदेवांची परवानगी मागितली तेव्हा गुरुदेवांनी त्यांना संमती देत सिटींगमध्ये सहभागी केले.

## गुरुदेवांप्रति संवेदनशीलता निर्माण करणे

अभ्यासींना गुरुदेवांचे आध्यात्मिक अस्तित्व त्यांच्या भौतिक अनुपस्थितीत कसे जाणवेल याची गुरुदेवांना चिंता वाटते, हे आपल्या लक्षात येऊ लागले आहे. याचा समतोल राखत त्यांची प्रकृती साथ देईल तसे ते अभ्यासींची त्यांना वैयक्तिकरित्या भेटण्याची अभिलाषा पूर्ण करत आहेत. वैयक्तीक अभ्यासी तसेच अभ्यासी गटांच्या शुभेच्छा गुरुदेवांपर्यंत पोहोचवण्याचे आणि त्यांची गुरुदेवांसमवेत पूर्व–परवानगीने भेट घडवण्याचे काम त्यासाठी नेमलेले स्वयंसेवक उत्तमरित्या पार पाडत आहेत. खरोखरच आवश्यकता असेल तर अशा भेटी होतील अन्यथा इतर सर्व बाबतीत अभ्यासींकडून त्यांच्या प्रकृतीवर आणि मनावर ताण पडू नये असे गुरुदेवांना वाटते. आपल्या प्रेमाने जर आपल्या प्रियतमाला क्लेश होऊ लागला तर अशा प्रेमाचा काय उपयोग?



# पूज्य बाबूजी महाराजांची जयंती

पूज्य बाबूजी महाराजांचा जन्म दिवस देशभरातील सर्वच केंद्रांमध्ये अतिशय उत्साहात, आनंदात, भक्तिभावात आणि आदरपूर्वक साजरा केला गेला. गुरुदेवांच्या सूचनेनुसार सर्व आश्रमांमध्ये आणि केंद्रांमध्ये हा सोहळा साजरा करण्यात आला. ह्या मंगलमय प्रसंगात सामील होण्यासाठी अभ्यासी मोठ्या अपेक्षेने आणि आतुरतेने जमले होते. यावेळी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . ब–याच अभ्यासींनी हे सगळे व्यवस्थित पार पाडण्यासाठी खूप कष्ट घेतले.

चेन्नई मध्ये गुरुदेवांनी सत्संगाचे संचलन केले आणि त्यानंतर भाषण दिले. त्यांनी आपल्या भाषणात असे सोहळे साजरे करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले आणि याप्रसंगी अशा महान व्यक्तींचे स्मरण करण्याविषयी सांगितले. त्यांनी सांगितले की, त्यांचे स्मरण म्हणजे भूतकाळातील आठवणी काढणे नसून त्यांचे अशा प्रकारे स्मरण करणे की जणू काही ते प्रत्यक्ष आपल्याबरोबर आज इथे उपस्थित आहेत अशी जाणीव असणे होय. बाबूजी महाराजांचा उल्लेख करून ते म्हणाले की आपण त्यांचे साधे सरळ जीवन आठवले पाहिजे.

गुरुदेवांनी याप्रसंगी “व्हिस्पर्स फ्रॉम ब्राईटर वर्ल्ड” चा चौथा भाग प्रकाशित केला. काही निवडक संदेश ध्वनिमुद्रीत केलेली एक एम पी 3 सीडी ही यावेळी प्रकाशित केली गेली. त्यातील काही संदेश यावेळी ऐकविण्यात आले.

विविध केंद्रांमध्ये साजरा झालेल्या कार्यक्रमाची छायाचित्रे तुम्हा सगळ्यांना तिथल्या कार्यक्रमाचा वृत्तांत देतील.


भिल्वाडा


अलुवा


अजमेर



अलिगढ


जोधपुर

# एकोज इंडिया वार्तापत्र



डेहराडून



दावणगेरे



कोलार



श्रीगंगानगर



बिकानेर



मदुराई



बेंगलोर



काशीपूर



रामपूर



सिद्दिपेट



रांची




नाहरलागुन



गोरखपूर




मिर्झापूर



उदयपूर



कानपूर



वाराणसी



पय्यनूर



नोयडा

## बंधूत्वाच्या वृद्धीसाठी यात्रा

वाराणसी, उत्तर प्रदेश



विंध्य पर्वत रांगांमध्ये सोनभद्र जिल्ह्यात वाराणसी नगरी वसलेली आहे. दूरस्थ उपकेंद्रांतील अभ्यासींमध्ये बंधूभाव विकसित व बळकट करण्यासाठीचा गुरुदेवांचा संदेश घेऊन वाराणसी केंद्रातील ३० अभ्यासींनी दि. २३ मार्च रोजी बसने यात्रेचा प्रारंभ केला. बंधू रवि जैन व बंधू आर. के. मालविय या प्रशिक्षकांनी त्यांचे स्वागत करुन अभीष्ट चिंतन केले. अदलहाट, राबर्टसगंज, रेणूकूट, शक्तिनगर, दुधी या सारख्या केंद्रांना त्यांनी भेट दिली असता तेथील स्थानिक तसेच जवळपासच्या केंद्रातील अभ्यासींनी त्यांचे स्वागत केले. अदलहाट व रिहंदनगर येथे कौटुंबिक मेळावे आयोजित करण्यात आले तर राबर्टसगंज, शक्तिनगर व दुधी येथे सत्संग घेण्यात आले. दोन दिवसांच्या या प्रवासामध्ये प्रत्येक अभ्यासीला जणू काही गुरुदेवच त्यांच्या समवेत प्रवास करत आहेत असे वाटत होते. गुरुदेवांची उपस्थिती व प्रेम प्रत्येक अभ्यासीच्या हृदयात तीव्र स्पंदने निर्माण करत होते. विविध केंद्रातील अभ्यासींनी व्यक्त केलेले प्रेम व स्नेह हे पराकोटीचे व अविस्मरणीय होते.

## युवकांसाठी कार्यक्रम

### अहमदाबाद, गुजरात

दि.२५ ते २६ फेब्रूवारी रोजी "युवावस्था–अभिवचन व प्रयत्न यांचा काळ" हा अहमदाबाद आश्रमातील केंद्रविषय होता. सहभागी अभ्यासींचे छोटे–छोटे गट करण्यात आले व त्यांना आश्रमातील काम वाटून देण्यात आले. त्यानंतर त्यांनी मैदानी खेळ खेळला व तो खेळताना जिंकण्यापेक्षा आनंद उपभोगण्याची भावना अधिक होती. पुणे केंद्राच्या सहभागींनी केलेल्या दृक–श्राव्य सादरी करणातून युवा अभ्यासींना मिशनच्या कोणकोणत्या उपक्रमांमध्ये सहभागी होता येईल या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. रविवारी सत्संगानंतर अभ्यासींना गुरुदेवांचे संदेश वाचण्यासाठी व त्यावर आत्मपरिक्षण करण्यासाठी देण्यात आले. त्यानंतर एक दृकश्राव्य लघुचित्रफीत दाखविण्यात आली व त्यातील आध्यात्मिक अर्थ समजून घेण्यास सांगण्यात आले. सुरत मधील अभ्यासींनी लालाजी महाराजांच्या जीवनावरील एक नाटिका सादर केली. सर्वसाधारण लोकांमध्ये सहजमार्गाविषयी कसे बोलावे व सहजमार्ग प्रतिनिधी म्हणून अभ्यासींनी कसे वागावे या विषयी उपयुक्त सूचना देण्यात आल्या. या कार्यक्रमानंतर युवा अभ्यासींमध्ये प्रेमबंधनाची भावना जागृत झाली.


### भिलवाडा, राजस्थान

दि.२६ फेब्रुवारी रोजी ७ अभ्यासींनी 'प्रेम' या विषयावरील युवा कार्यक्रमात भाग घेतला. मिशनच्या विविध पुस्तकांतील उताऱ्यांवर त्यांनी चर्चा केली व आपली मते मांडली. दि.२५ मार्च रोजी सत्संगानंतर ९ अभ्यासींनी युवा पिढीमध्ये सहजमार्गाविषयी जागृती कशी निर्माण करता येईल व मिशनच्या उपक्रमांमध्ये त्यांना कसे सहभागी करून घेता येईल याविषयी चर्चा केली. प्रत्येक आठवड्यात सत्संगानंतर एखादी नाटिका सादर करावी तसेच प्रेमबंधाची भावना बळकट करण्यासाठी उन्हाळ्याच्या सुट्टीत सहलीकरिता जावे अशा सूचना प्राप्त झाल्या.


## नवीन प्रकाशने




'प्रेम आणि मृत्यु' याच्या तामिळ अनुवादाचे पुन:मुद्रण




हार्ट–स्पीक २०११
इंग्रजी




हार्ट–स्पीक २०१०
डि.व्ही.डी.




शहाजहांपूरमध्ये बाबूजी
१९७१–१९७५
एम.पी.३




हार्ट–स्पीक २००९

भारतामध्ये २००९ मध्ये गुरुदेवांनी दिलेली भाषणे व अनौपचारिक संभाषणे यांचे संकलन–'हृदयीचे बोल' या मालिकेमधील नवीन भर.



व्हिस्पर्स
(काही निवडक संदेश)
एम.पी.३




हार्ट–स्पीक २००८
एम.पी.३

# आश्रम विकास





## जयपूर, आंध्रप्रदेश

रविवार दि. २५ मार्च रोजी गुरुदेवांनी अदिलाबाद जिल्ह्यातील जयपूर येथील ध्यानकक्षाचे चेन्नई येथून उद्घाटन केले. त्यांनी आश्रमाच्या १० एकर जागेचा व्हिडिओ पाहिला व नंतर उद्घाटन झाल्याचे घोषित केले. या घोषणेनंतर २०० पेक्षा अधिक अभ्यासींनी शांतपणे ध्यानकक्षात प्रवेश करुन सत्संगात भाग घेतला. १५०० अभ्यासी बसू शकतील इतकी या ध्यानकक्षाची क्षमता आहे. कोळसा क्षेत्रातील (कोल–बेल्ट) गोदावरीखाणी, मांचेरीयल , श्रीरामपूर , मंदामर्री, बेल्लामपल्ली आणि गोलेटी या केंद्रांसाठी आता मिशनचा आश्रम उपलब्ध होईल.

## बारगुर, तामिळनाडू

बंधू एस. प्रकाश (विभागप्रमुख, उत्तर तामिळनाडू) यांनी जवळजवळ ५० अभ्यासींच्या उपस्थितीत तामिळनाडूतील कृष्णागिरी जवळील बारगूर येथील ध्यानकक्षाचे दि.३ मार्च रोजी उद्घाटन केले. त्यानंतर सत्संगाचे संचालन करण्यात आले. तसेच अभ्यासींची संख्या आणि प्रत वाढविण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

## चिखली ,महाराष्ट्र

इ.स. २००५ मध्ये चिखली ,महाराष्ट्र येथे आश्रमाकरिता जमीन विकत घेण्यात आली होती. मध्यंतरीच्या काळात ध्यानकक्ष, गुरुदेवांचे कुटीर आणि स्वयंपाकघर बांधण्यात आले होते. सर्वजण गुरुदेवांच्या हस्ते उदघाटन होण्याची प्रतीक्षा करीत होते. परंतु गुरुदेवांच्या प्रवास करण्यावर बंधन आल्याने १२ अभ्यासींचा एक गट आश्रमाचा व्हिडिओ घेऊन मणपाक्कम येथे गुरुदेवांना भेटण्यास गेला. दि.२७ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांनी आश्रमाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. दि.२९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी गुरुदेवांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चिखलीच्या अभ्यासींसमवेत उपस्थित राहून सर्वांना सुखद आश्चर्याचा धक्का दिला. ते अभ्यासींशी स्थानिक भाषेत बोलले व त्यांनी बंधू निवृत्ती यांना सत्संग सुरू करण्यास सांगितले. त्यावेळी चिखली आणि जवळपासच्या बुलढाणा, खामगाव, किन्होला, देऊळगाव घुबे या केंद्रांमधील सुमारे १०० अभ्यासी येथे उपस्थित होते.

## दमण

ऑक्टोबर २००८ पर्यंत रविवारच्या सत्संगाकरिता दमण केंद्राच्या अभ्यासींना वापी येथे जावे लागत असे. नोव्हेंबर २००८ मध्ये गुरुदेवांनी बंधू शैलेंद्र यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आणि बंधू एम. एस. पांडे यांच्या निवासस्थानी २० अभ्यासींकरिता सत्संग सुरू करण्यात आला. अभ्यासींची संख्या ३५ पर्यंत वाढल्याने बंधू पांडे यांनी पहिल्या मजल्यावर ध्यानकक्ष बांधण्याचा प्रस्ताव मांडला. मार्च २०१२ मध्ये १६०० चौ. फूटाचे ध्यानकक्षाचे काम पूर्ण झाले. अभ्यासींनी पंखे, खुर्च्या, टेबल, पुस्तकाची कपाटे इ. गोष्टी देणगीच्या स्वरूपात देऊ केल्या.

दि. १ एप्रिल रोजी जवळपासच्या केंद्रांतील अभ्यासींच्या आणि सूरतचे केंद्रप्रमुख तसेच गुजरातच्या विभाग–प्रमुखांच्या उपस्थितीत या नवीन ध्यानकक्षाचे उद्घाटन झाले. नव्वद अभ्यासी व एकवीस मुले या कार्यक्रमाला हजर होती. बंधू अनिल व विभागप्रमुख बंधू राजूभाई व बंधू सुरेंद्र यांनी या प्रसंगी उपस्थितांना संबोधित केले. नजीकच्या केंद्रांतील अभ्यासींनी केंद्रांच्या विकासासाठी ते करीत असलेल्या उपक्रमांविषयी माहिती दिली. नैतिक मूल्यांवर आधारित एकनाटिका व उपस्थित अभ्यासी व त्यांच्या मुलांनी सादर केलेली भजने यांचा या कार्यक्रमात समावेश होता.

## विल्लूपूरम, तामिळनाडू

विल्लूपूरम केंद्रातील अभ्यासींच्या गटाने आश्रमाच्या जमिनीसंदर्भातील कागदपत्रे दाखविण्यासाठी मणपाक्कम येथे गुरुदेवांची भेट घेतली. खरेतर हा गट नऊ अभ्यासींपुरताच मर्यादीत ठेवण्याचे ठरविले होते, परंतु प्रेमपूर्वक हृदयाने वाट पहात असणाऱ्या बाकीच्या उत्सुक अभ्यासींनादेखील गुरुदेवांना भेटण्याची परवानगी मिळाली. गुरुदेवांनी विल्लूपूरमला भेट देण्याचे वचन दिले व त्यांना एक रात्र तेथे राहता येईल का? अशी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मुलांसमवेत काही काळ व्यतीत केला. गुरुदेवांनी अभ्यासींना आश्रमाच्या कामाची सुरुवात करण्यास सांगितले. गुरुदेवांच्या या भेटीने अभ्यासी सद्गदित व कृतकृत्य झाले.







## झोनल आश्रम, बंगळुरु

झोनल आश्रम बंगळुरु येथे एक नवीन ध्यानकक्ष उभारण्यात आला आहे. दि. १९ फेब्रुवारी २०१२ रोजी हा नवीन ध्यानकक्ष पूज्य गुरुदेवांनी या युगातील समर्थ सद्गुरु परमपूज्य बाबूजी महाराजांना समर्पित केला. या ध्यानकक्षाचे क्षेत्रफळ ८० गुणीले १२० चौ. फूट इतके असून २००० अभ्यासी बसू शकतील इतकी याची क्षमता आहे. हा मोकळ्या पद्धतीचा कक्ष असून आजूबाजूच्या हिरवळीस आणि स्थानिक हवामानास अनुकूल असा आहे.

या प्रसंगाच्या अनुषंगाने दि. २६ फेब्रुवारी २०१२ रोजी या ठिकाणी संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सकाळी ९ वाजता आणि सायंकाळी ४ वाजता असे दोन सत्संग संचालित करण्यात आले.या कार्यक्रमात जवळपासच्या केंद्रातील व स्थानिक अभ्यासी मिळून एकूण १,३५३ व्यक्ती व १२५ मुले सहभागी झाली होती.'गुरु आणि लक्ष्य' या विषयाला उद्देशून बंधू ए. पी. दुरै, बंधू प्रसन्ना, बंधू नागराज आणि बंधू वेंकटाद्री यांनी दिलेल्या भाषणांमुळे अभ्यासी आत्मपरीक्षण करण्यास उद्युक्त झाले.नुकत्याच नेमलेल्या ए.एम.सी. संघासाठी हा अनुभव खूपच समृद्ध करणारा आणि अनेक गोष्टी उलगडून दाखवणारा होता.

## संपूर्ण दिवसाचे कार्यक्रम

### भिलवाडा, राजस्थान (४ मार्च २०१२)

मिशनमध्ये प्रवेश करण्यासाठी उद्युक्त करणाऱ्या कारणांची उदा. – मन:शांती, दैनंदिन जीवनात सामोरे जावे लागणारे प्रश्न, सत्याचा शोध, ईश्वराचा शोध इ. यावर नवीन आणि जुन्या अभ्यासींच्या समूहाने चर्चा केली. त्यानंतर त्यांनी साधनेसंदर्भातील अडचणी तसेच अभ्यासींमध्ये एकमेकांसमवेत सुसंवाद साधण्याविषयीच्या समस्या यावरही वार्तालाप केला.

अनेक उपस्थित अभ्यासींनी ह्या अडचणी सोडविताना त्यांना गुरुदेवांची उपस्थिती व मदत कशा प्रकारे जाणवली हे सांगितले. थोडक्यात सांगायचे तर गुरुदेवांचे निर्व्याज प्रेम आणि त्यांचे सहाय्य या दोन गोष्टी आध्यात्मिक पथावर पुढे मार्गक्रमण करण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या ठरल्या. या कार्यक्रमामुळे त्यांच्या समस्यांचे निराकरण होऊन, गुरुदेवांप्रति त्यांची श्रद्धा वाढीस लागावी व त्यामुळे त्यांच्या खऱ्या लक्ष्यापर्यंत पोहचण्यासाठी मार्ग खुला व्हावा अशी आशा आहे.



### विरुधुनगर आश्रम, तामिळनाडू



दि. १८ मार्च रोजी 'इच्छाशक्तीची ताकद', 'आता जागृत व्हा' यासारख्या विषयांवरील गटचर्चेमध्ये विरुधुनगर आणि जवळपासच्या उपकेंद्रांमधून आलेले ५२ अभ्यासी सहभागी झाले होते. चर्चेमध्ये गुरुदेवांच्या "गुरु आणि लक्ष्य" या पुस्तकातील उद्धरणांचे वाचन करण्यात आले आणि त्यांचे स्पष्टीकरण देण्यात आले. यावेळी स्वच्छतेच्या आणि बागकामाच्या स्वयंसेवी कार्यातही अभ्यासींनी रुचि दाखविली. संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम म्हणजे गुरुदेवांच्या सतत स्मरणात राहण्याची एक अद्भूत संधी असल्याची अभ्यासींना जाणीव झाली.

### तिरूर आश्रम, केरळ (२५ मार्च २०१२)

नदी आणि तिन्ही बाजूंनी वेढलेला अमर्याद अरबी समुद्र अशा नैसर्गिक सौंदर्याची तिरुर आश्रमास देणगी लाभली आहे. तिरुर रेल्वेस्थानकापासून हा आश्रम १४ कि. मी. अंतरावर आहे. दि. ४ एप्रिल २००९ रोजी या आश्रमाचे उदघाटन झाले आणि तेव्हापासून येथे प्रत्येक रविवारी संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ लागला.

दि. २५ मार्च रोजी संपूर्ण दिवसाचा एक मोठा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. पोन्नानी, मंजेरी, पेरिंथालमन्ना, पत्तांबी आणि वाल्लनचेरी या जवळपासच्या केंद्रांमधून सुमारे २०० अभ्यासी व मुले या सोहळ्यात सहभागी झाली होती. कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या ७:३० च्या सत्संगाने झाली. यामध्ये 'तीन एम' (मास्टर– गुरुदेव, मेथड–पद्धती व मिशन) तसेच गृहस्थ जीवनातील सहजमार्गाचे स्थान या विषयांवर भाषणे झाली. ही भाषणे इतकी अभ्यासपूर्ण आणि माहितीप्रद होती की, अनेक अभ्यासींनी आपल्या गृहस्थजीवनात याची अंमलबजावणी करण्याचा व बदल अनुभवण्याचा संकल्प केला.

दुपारी युवा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक महिन्यात विविध आश्रमांत अशा बैठकींचे आयोजन करण्याचे यावेळी ठरविण्यात आले. बालकेंद्रामध्ये (चिल्ड्रेन सेंटर) सर्व मुलांनी आयत्या वेळच्या नाटिकांच्या कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी मुलांना मूल्याधारित गोष्टी सांगण्यात आल्या. मुलांचे गटांमध्ये विभाजन करून त्यांना या गोष्टींवर आधारित नाटिका प्रस्तुत करण्यास सांगितले गेले. मुलांनी यात उत्साहाने सहभाग घेतला. सायंकाळच्या सत्संगाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कार्यशाळा व संमेलने

## मुंबईच्या अभ्यासींकरिता संमेलन
### चेन्नई – २६ फेब्रुवारी ते ३ मार्च २०१२



दि. २६ फेब्रुवारी रोजी गुरुदेवांना सत्संगासाठी ध्यानकक्षामध्ये आलेले पाहून व विवाह संपन्न करताना पाहून जमलेल्या मुंबईच्या सुमारे ५०० अभ्यासींच्या आनंदाला उधाण आले होते. गुरुदेवांच्या पाउलखुणांवर चालण्यासाठी त्यांच्या भौतिक देहाकडे न पाहता हृदयाचा वापर करावा असे बंधु कमलेश पटेल यांनी याप्रसंगी सांगितले.

बंधु अल्बर्टो आणि भगिनी ललिता श्रीनिवासन यांनी 'बंधुभाव' व 'हृदयीचे बोल' या विषयांवर भाषणे व परस्परसंवादी सत्रे आयोजित केली. बंधु राजगोपाल यांनी 'साधना' या विषयावर आणि बंधु सोमकुमार यांनी 'मिशनमध्ये सेवा', 'सतत स्मरण' व 'बंधुभाव' या विषयांवर प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमाचे संचालन केले.

दि. २९ च्या सायंकाळी गुरुदेवांनी सुमारे ५० नवीन अभ्यासींची आपल्या कुटीरात भेट घेतली. दि. १ मार्च रोजी त्यांनी सर्वांसमवेत काही वेळ व्यतीत केला. साधनेसंबंधीच्या गंभीरतेवर भर देऊन, जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ध्यान करावे असे सांगून अभ्यासीच्या जीवनातील वेळेच्या नियोजनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

अभ्यासींनी एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हे संमेलन समर्पित वृत्तीने साधना करण्यासाठी प्रेरणा देणारे व सरतेशेवटी गुरुदेव जसे इच्छितात तसे बनण्यासाठी चालना देणारे असे होते.

## शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम
### आर. के. पुरम आश्रम, नवी दिल्ली, २३ ते २५ मार्च २०१२



अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख, बंधू संतोष श्रीनिवासन यांनी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बऱ्याच कार्यशाळा व चर्चांचे आयोजन केल्यानंतर अध्यात्मिक प्रशिक्षण कार्यक्रम गटाने अभ्यासी प्रशिक्षणाची मूलभूत गरज जाणली व "साधनेची पायाभरणी" (Grounding in the Practice) या नावाखाली प्रशिक्षणाचा पहिला अभ्यासक्रम सादर केला. विभिन्न क्षेत्रांमधून आलेल्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांनी आपापल्या केंद्रांमध्ये ते प्रशिक्षण पुढे चालवावे हा या प्रशिक्षणाचा उद्देश होता.

उत्तर भारतातील क्षेत्र क्र. ९–१२ व १८ या क्षेत्रामधून एकूण ६३ प्रतिनिधींनी या कार्यक्रमात भाग घेतला. त्या दरम्यान बंधू कमलेश पटेल दिल्ली येथे होते. त्यांनी दि. २४ मार्च रोजी या उपस्थितांना संबोधले. या कार्यशाळेमध्ये भाग घेतल्याने बराच लाभ झाल्याचे मत अनेक प्रतिनिधींनी प्रकट केले.

## प्रशिक्षकांसाठी कार्यशाळा
### वडुगापट्टी आश्रम, तामिळनाडू



त्रिची येथील वडुगापट्टी आश्रमामध्ये उत्तर तामिळनाडू भागातील ६८ प्रशिक्षकांसाठी दि १६ व १७ मार्च या दोन दिवसांसाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. विभाग–प्रमुख बंधू एस. प्रकाश यांनी 'सर्वांकरिता आध्यात्मिकता' या विषयाला केंद्रस्थानी ठेऊन ह्या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

सन २०१७ पर्यंत या विभागातील अध्यात्मिक आकांक्षा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने सहज मार्गाबद्दल एकदातरी ऐकलेले असावे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.

या विषयावर चर्चासत्रे व विचार–विनमय सत्राचे आयोजन केले होते. सहभागींना विविध गटांमध्ये विभागून त्यांना या विषयावर एक नाटिका तयार करून ती प्रस्तुत करण्यास सांगितले गेले. काही गमतीदार प्रसंगांसोबतच या नाटिका विचार करण्यास उद्युक्त करणाऱ्या होत्या. त्यातून मिळालेल्या निवेशनातून नवीन कल्पना व त्या अनुशंगाने करावयाच्या क्रिया यांची यादी करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी या गटाने तंजावूर आश्रामाला भेट दिली. तेथे काही प्रशिक्षकांची भाषणे झाली. बंधु एस. प्रकाश यांनी सामूहिक कार्याच्या व आपल्या ध्येयाकडे एकाग्र होण्याच्या गरजेवर भर दिला.

## मिशनच्या साहित्यावर कार्यशाळा

### कर्नाटक

अभ्यासींमध्ये मिशनचे साहित्य वाचण्याची प्रेरणा देण्यासाठी बंगळुरू केंद्रातील प्रकाशन विभागाच्या स्वयंसेवकांनी एक कार्यशाळा आयोजित केली होती. ती शिमोगा व हंसूर या ठिकाणी घेण्यात आली.

दिनांक १२ फेब्रुवारी रोजी शिमोगा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत शिमोगा, भद्रावती, न्यामती व मेंगलोर केंद्रांतील ३२ अभ्यासी सहभागी झाले होते. दिनांक २५ मार्च रोजी हंसूर आणि पेरीयापाटना येथील ३० अभ्यासी हंसूर येथील शास्त्री शाळेच्या सभागृहात जमा झाले होते.

दोन्ही ठिकाणी अभ्यासींना मिशनचे एक पुस्तक वाचून त्यातील गुरुदेवांनी सांगितलेली एक गोष्ट निवडण्याची पूर्वसूचना देण्यात आली होती. आपल्या साधनेचा एक भाग म्हणून मिशनचे साहित्य दररोज, काळजीपूर्वक वाचण्यावर जोर देण्यात आला होता.

अभ्यासींचे गट करण्यात आले व त्यांनी निवडलेली गोष्ट वाचून त्यातील मूल्यांवर चर्चा करण्यास सांगण्यात आले. ती मूल्ये आपल्या दररोजच्या जीवनात उपयोजली जातात की नाही, जर नसतील तर तसे करण्यात काय अडचणी येतात, व त्या अडचणी कशा दूर करता येतील यावर चर्चा करण्यात आली.

त्यानंतर गुरुदेवांची गोष्टी सांगत असल्याची चित्रफीत दाखविण्यात आली. सर्व अभ्यासींनी यात सक्रियतेने, उत्साहाने भाग घेतला व त्यांना त्याचा खूप लाभ झाला. या ठिकाणी मिशनच्या साहित्याच्या विक्रीची व्यवस्था करण्यात आली होती.

## मुलांकरिता क्रीडा दिवस

### बाबूजी मेमोरियल आश्रम मणपाक्कम , चेन्नई

दि. १ एप्रिल २०१२ रोजी बाबुजी मेमोरीयल आश्रमात मुलांसाठी क्रीडा दिवस आयोजित केला होता. ६ ते ८ वर्षे, ८ ते १० वर्षे व १० ते १२ वर्षे या तीन वयोगटातील सुमारे १६० मुले निरनिराळ्या खेळांच्या उपक्रमात सहभागी झाली होती. लिंबू चमचा, जोडी शर्यत, बेडुक उड्या, सुदैवी कोपरा व असे विविध खेळ खेळाच्या मैदानावर सकाळी १० ते १ या वेळेत खेळण्यात आले. मुलांनी अत्यंत उत्साहाने या सर्व खेळांमधे भाग घेतला व खूप मजा केली. कार्यक्रमाची सुरुवात मुलांनी व स्वयंसेवकांनी म्हटलेल्या प्रार्थनेने झाली. शेवटी बक्षीस समारंभ झाला.



## स्वयंसेवकांसाठी कार्यशाळा

### वेल्लोर, तामिळनाडू



दि, २५ व २६ फेब्रुवारी रोजी वेल्लोर येथे स्वयंसेवकांकरिता एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. वेल्लोर व आजूबाजू च्या केंद्रातील सुमारे चाळीस अभ्यासी यात सहभागी झाले होते. स्वयंसेवकांना त्यांच्या साधनेकरिता व सांघिक कामाकरिता प्रेरीत करणे व व्यावहारिक मार्गाने हृदयाशी जोडून घेण्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा या कार्यक्रमामागील उद्देश होता. गटचर्चेकरिता चार विषय देण्यात आले होते. 'ऐकण्याचे महत्त्व' अधोरेखित करणाऱ्या, परस्पर संवादासाठी मार्गदर्शक अशा तत्त्वांचा उपस्थितांना परिचय करून देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान वातावरण दिव्यत्वाने भारलेले होते.

## मेळावा

### सवाई माधोपूर

दि. ३ मार्च रोजी सवाई माधोपूर केंद्राचे अभ्यासी सहज मार्ग साधनेविषयीचे एक सत्र व प्रश्नमंजुषेच्या कार्यक्रमासाठी एकत्र जमले होते. या कार्यक्रमाचे आयोजन बंधू अयोध्या प्रसाद व संयोजन जयपूर केंद्राच्या बंधू संदीप यांनी केले होते. अभ्यासींचे दोन गटात विभाजन करण्यात आले. सहज मार्ग साधनेला उत्तम प्रकारे समजण्यासाठी प्रत्येक गटाने आपले मुद्दे मांडले. हे सत्र परस्पर–संवादी असून प्रश्नमंजुषेकरिता वापरण्यात आलेले साहित्य गुरुदेवांच्या भाषणांमधून घेतलेले होते. योग्य प्रकारे नियोजन करून गृह–मेळावे आयोजित करण्यासाठी स्थानिक अभ्यासी प्रेरीत झाले.

## आध्यात्मिकता व वैद्यकीय पेशा

### कासरगोड, केरळ – ११ मार्च २०१२

दि. ११ मार्च रोजी 'आध्यात्मिकता व वैद्यकीय पेशा' या विषयावर एक परिसंवाद बेला, कासरगोड येथे आयोजित करण्यात आला होता. कालिकत ते कासरगोड दरम्यानच्या १४ डॉक्टरांनी यात भाग घेतला. वैद्यकीय शिक्षणात आध्यात्मिकतेचे महत्त्व अधोरेखित करण्याचा या परिसंवादाचा उद्देश होता. हल्ली केवळ रोगाच्या उपचारावर लक्ष दिले जाते, रुग्णाचा विचार केला जात नाही. डॉक्टर पैसे कमाविण्याचा विचार करत असतो तर रुग्ण खर्चामुळे चिंतेत असतो. डॉक्टरने जर ठरविले तर तो रोग्याच्या मनोवृत्तीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणू शकतो व त्याला आध्यात्मिकतेची ओळख करून देऊ शकतो.

# निबंधलेखन स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ


बेळ्ळारी, कर्नाटक

वर्ष २०११ च्या वार्षिक निबंध लेखन स्पर्धेत भाग घेऊन विविध स्तरांवर पारितोषिके प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यासाठी संपूर्ण भारतभर समारंभ आयोजित करण्यात आले. उत्तर कर्नाटकातील बेळ्ळारी, गुलबर्गा, हुबळी व बिदर; तर तामिळनाडूमधील तुतिकोरीन, तिरुचेंदूर, कोवीलपट्टी ऊटी व तिरुप्पूर; गुजरात मधील भूज, मेहसाणा, वडोदरा तसेच झारखंड मधील रांची या केंद्रांमध्ये असे समारंभ फेब्रुवारी, मार्च व एप्रिल २०१२ दरम्यान संपन्न झाले. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना आमंत्रित करण्यात आले होते. विविध गटांतील विजेत्यांना प्रमाणपत्रकांचे वितरण करण्यात आले. मिशनच्या उपक्रमांविषयी जागृती निर्माण करणारी तसेच अशा निबंध स्पर्धा भरविण्यामागील उद्देश स्पष्ट करणारी भाषणेही झाली. अधिक माहितीच्या इच्छुकांना मिशनबद्दलची लिखित सामुग्री पुरविण्यात आली.


हुबळी, कर्नाटक


तिरुप्पूर, तामिळनाडू


तुतिकोरीन, तामिळनाडू


कोवीलपट्टी, तामिळनाडू



बिदर, कर्नाटक



वडोदरा, गुजरात


भूज, गुजरात


ऊटी, तामिळनाडू


मेहसाणा, गुजरात



गुलबर्गा, कर्नाटक


रांची, झारखंड

# प्रकाशाचे केंद्र

## विजयवाडा आश्रम, आंध्र प्रदेश

भारतातील सर्वात जुन्या केंद्रांपैकी एक असलेले विजयवाडा हे केंद्र गेल्या पाच दशकांपासून या विभागातील अभ्यासींसाठी आध्यात्मिकतेचे एक चेतना केंद्र आहे. इ.स. १९५९ मध्ये जेव्हा पूज्य बाबूजी महाराजांनी या शहरास भेट दिली तेव्हा हे केंद्र अस्तित्वात आले. त्यावेळी केवळ अर्धा डझनच अभ्यासी होते. १९६३ साली त्यांनी पुन्हा एकदा या केंद्रास भेट दिली, तीन दिवस या ठिकाणी त्यांनी वास्तव्य केले व सत्संगांचे संचालन केले. दि. २५ मे १९६७ या दिवशी त्यांनी प्रशिक्षक बंधू डॉ. व्ही. पार्थसारथी यांच्या घरातील पहिल्या मजल्यावर असलेल्या ध्यानकक्षाचे उद्घाटन केले. या विभागास जेव्हा चक्रीवादळाचा तडाखा बसला तेव्हा बाबूजी महाराज विजयवाड्यातच होते.



### ध्यानकक्षाच्या उद्घाटन समयीचा बाबूजींचा संदेश– दि. २५ मार्च १९६७

"आपल्या पूर्वजांनी आत्मसाक्षात्काराचा मार्ग जंगलात शोधला, सर्वसंग परित्याग करुन, सर्व बंधने तोडून, जित्या–जागत्या माणसांपासून, जीवनापासून दूर जाऊन. आपण, आपल्या या सहजमार्ग पध्दतीत तसे वातावरण आपल्या भोवती, आपल्या घरात निर्माण करतो, ज्यामुळे जंगलात जाण्याचा हेतू साध्य होतो."

दि. १६ मे १९७२ रोजी बंधू संकरा वेंकटापय्या यांनी शहराच्या मध्यावर असलेली १६७२.२६ चौ.मी. जागा मिशनला अर्पण केली. आश्रम मुख्य रस्त्यावर आहे आणि मध्यवर्ति बस स्थानक व रेल्वे स्थानक या दोन्ही पासून केवळ ४ कि.मी अंतरावर आहे. ४२० चौ.मी.वर बांधण्यात येणाऱ्या ध्यानकक्ष, कार्यालय, निवासकक्ष तसेच गुरुदेवांच्या कुटीराचा पायाभरणी समारंभ गुरुदेवांच्या हस्ते दि. १८ मार्च १९८७ रोजी संपन्न झाला. दि. २४ जुलै १९९५ रोजी अलाहाबादच्या डॉ. चंद्रिका प्रसाद यांनी या आश्रमाचे उद्घाटन केले. २००२ च्या डिसेंबर मध्ये दि. २२,२३ व २४ ह्या तीन दिवशी गुरुदेवांनी आश्रमाला भेट दिली. राज्यातील विविध भागांतून आलेल्या अभ्यासींनी त्यांच्या कृपाप्रसादाचा लाभ घेतला.



२००५ मधे ध्यानकक्षासाठी प्रशस्त मार्गिका असलेला पहिला मजला बांधण्यात आला. यानंतर ध्यानकक्षामागेच २८४ चौ.मी. पाया असलेली एक इमारत सहज मार्ग स्पिरीच्युअॅलिटी फाउंडेशन साठी विकत घेण्यात आली. सर्व पायाभूत सुविधा पूर्ण होण्यासाठी स्वयंपाकघर व ग्रंथालय बांधावयाचे ठरवले आहे.




एस. एम. एस. एफ. इमारतीतील वैद्यकीय केंद्रात सर्व प्राथमिक वैद्यकीय सुविधा पुरविलेल्या आहेत व प्रत्येक रविवारी अनेक अभ्यासी व स्थानिक लोक तेथे उपलब्ध असलेल्या डॉक्टरांच्या सेवेचा लाभ घेतात. रुग्णांना सर्व औषधे नि:शुल्क दिली जातात.



आश्रमामध्ये दररोज सकाळी आणि दर रविवारी व बुधवारी संध्याकाळी सत्संग होतो. सुमारे २५० अभ्यासी रविवारच्या सत्संगाला हजर असतात. केंद्रात नियमीतपणे खुले सत्र, अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम, व्ही.बी.एस.ई उपक्रम इत्यादींचे आयोजन केले जाते. इच्छुकांसाठी स्वागत कक्ष आणि नवीन अभ्यासींसाठी खुलासा सत्राचे आयोजन प्रत्येक रविवारी केले जाते. तसेच युवावर्गासाठी परस्पर–संवाद सत्रे सुद्धा नियमीतपणे होतात. आश्रम परिसरात बांधकामाचा विस्तार करण्याच्या केंद्राच्या योजना आहेत.



मिशनच्या मूलभूत वृत्तीला स्मरून, पूज्य गुरुदेवांचा संदेश संपूर्ण जिल्हाभर प्रसारित करण्याचे कार्य हे केंद्र करीत आहे.

**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.